मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५.
**www.marathepratishthan.org**

- प्रतिक्रिया व सुचनांसाठी : admin@marathepratishthan.org
- प्रतिष्ठानविषयक माहितीसाठी : info@marathepratishthan.org
- हितगुज सुचना व साहित्य यासाठी : hitguj@marathepratishthan.org

परस्परं भावयन्तः
म प्र
**मराठे प्रतिष्ठान**

शनिवार, 2 एप्रिल 2022

प्रिय कुलबांधव व भगिनींना सस्नेह नमस्कार.

मराठे प्रतिष्ठान विश्वस्त मंडळ, कार्यकारी मंडळ, आणि वैयक्तिक माझ्यातर्फे आपल्या सर्वांना गुढीपाडवा व हिंदू नववर्षाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

मार्च 2020 पासुन आपल्या सर्वांच्या लक्षात राहील अशा कोरोनाच्या भयानक वातावरणात गेली दोन वर्ष कशी गेली हे सर्वांनाच माहीत आहे. अजून किती काळ या दिव्यातून आपल्याला जावे लागणार आहे ही टांगती तलवार सर्वांच्याच डोक्यावर आहे. आपल्यापैकी काहींना व्यवसायात आर्थिक तुटीचा सामना करावा लागला असेल. काहींच्या नोकऱ्याही गेल्या. समाधानकारक बाब ही आहे की आता त्यावर लस ऊपलब्ध आहे. आपल्या पैकी बऱ्याच जणांनी ही लस टोचून घेतली असेलच. आतातर 12 वर्षांवरील सर्व व्यक्तींसाठी लसीकरण मोहीम खुली केली आहे. आपल्या वयोगटानुसार प्रत्येकाने ही लस टोचून घ्यावी. कारण लसीकरण हाच या रोगावरील प्रभावी उपाय असल्याचे सध्यातरी संकेत आहेत. असे करून आपण सर्वांनी अप्रत्यक्षपणे एका राष्ट्रकार्याला हातभार लावूया!

या वर्षीच्या गुढीपाडव्याचे वैशिष्ट्य म्हणजे कोरोनाची जवळपास सर्वच बंधने शिथिल झाली आहेत. काल पासून तर मास्क घालणे हे सुद्धा ऐच्छिक केले आहे. आतापर्यंत गेले दोन वर्ष आपण कोरोनाच्या बंधनात जखडून गेलो होतो पण त्यामुळे सर्वजण आत्मनिर्भर होत गेले एकमेकांतील संपर्क प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मोबाईलमुळेच वाढला गेला. त्यामुळे जरी सर्व स्थिरस्थावर झाले तरी संकेतस्थळ आणि किंवा इतर उपलब्ध डिजीटल माध्यमातूनच आपल्याला संवाद सुरु ठेवणे यापुढे अगत्याचे झाले आहे. या कारणानेच मी पुनःश्च एकदा आवाहन करतो की ज्या सभासदांनी आपले इमेल आयडी आणि व्हॉट्सअॅप नंबर पाठवले नसतील त्यांनी ते कार्यवाह हेमंत यांच्या 9822847120 या मोबाईल नंबरवर तातडीने पाठवून द्यावेत ही विनंती आहे.

सद्यपरिस्थितीत नवनवीन नियमानुसार सर्वच कामे पुर्ण करण्यात खुपच अडचणी येत आहेत. त्या करता आपल्या सभासदांच्या कुटुंबातील कोणी सी.ए. असतील त्यांनी जरूर योग्य त्या कामात मार्गदर्शन करून प्रतिष्ठानला सहकार्य करावे.

यापुढे पत्रव्यवहार तसेच आपले लाडके त्रैमासिक 'हितगुज' आपल्यापर्यंत पोहोचविणे दिवसेंदिवस अशक्य होत जाते आहे मनुष्य बळाच्या अभावी. जर कोणी संपूर्ण जवाबदारी स्वीकारणार असेल तर अशा सभासदांनी जरूर पुढे येऊन प्रतिष्ठानला सहकार्य करावे.

संकेतस्थळ आणि व्हॉट्सअॅप यासारखी माध्यमे उपलब्ध असल्याने 'हितगुज'चे अंक आपल्यापर्यंत पोहोचवता आले. आपण नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करत आहोत व त्यात आपल्याला आपल्या सभासदांकडुन चांगला प्रतिसाद मिळत आहे.

या सरत्या वर्षी आपल्या पुणे शाखेच्या काही कार्यकर्त्यांच्या मनात एक कल्पना आली आणि ती लगेच अंमलात पण आणली गेली. एक महत्त्वपूर्ण कार्य पुणे शाखेतर्फे केले गेले ते म्हणजे आपल्या परिवारातील ज्या व्यक्तींचे दुखःद निधन झाल्याचे ज्ञात झाले अशा व्यक्तींच्या घरी दुखवटा म्हणून दिवाळीत फराळाचे पॅकेट व्यक्तिशः पोहोचवले गेले. यांत विशेषतः सौ. मानसी मराठे गाडगीळ, सौरभ धनंजय मराठे आणि योगेश गाडगीळ यांचे सहकार्य मिळाले. हाच उपक्रम आपल्या परिवारातील सर्वच ठिकाणच्या कुलबांधवांनी अंमलात आणला तर चांगलेच होईल असे वाटते. नवनवीन कार्यकर्ते सभासद होऊन आपला थोडा वेळ जरी प्रतिष्ठानकरता देऊ इच्छित असतील तर याचा जरूर विचार करता येईल. दिवसेंदिवस सध्याचे विश्वस्त तसेच कार्यकारी मंडळातील बरेच सदस्य हे बरेच वर्ष कार्यरत आहेत. वृद्धत्वामुळे कामासाठी उपलब्ध होऊ शकत नाहीत. पण म्हणून नवीन सभासदांनी दुर्लक्ष करावे असे नाही.



मला खेदाने नमूद करावे लागत आहे की दिवाळीपासून ते आतापर्यंत फक्त 4 च नवीन सभासद झाले. आणि रु. 40000/- देणगी जमा झाली. ज्यांनी देणगी दिली त्यांचे मनापासून अभिनंदन आणि आभार.

वारंवार आवाहने करूनही मराठे कुळातील व्यक्तींकडून मदतीसाठी अर्ज येत नाहीत. मात्र धर्मादाय आयुक्तांच्या अखत्यारीतील संस्थांवर असलेल्या कायदेशीर बंधनामुळे देणग्या आणि व्याजाद्वारे प्राप्त उत्पन्नातील 85% रक्कम सामाजिक उद्दिष्टांसाठी खर्च करणे आवश्यक असते. याचे पालन करण्यासाठी या वर्षांत आपल्या संस्थेची उद्दिष्टे आणि सामाजिक जाणीव लक्षात घेऊन आपण आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या व्यक्तींना वैद्यकीय अथवा शैक्षणिक मदत तसेच वृद्धांच्या आणि मतिमंदांच्या सेवेसाठी कार्यरत असलेल्या आणि वृद्धाश्रम चालविणाऱ्या संस्थांना त्यांच्या कार्यासाठी आर्थिक मदत केली. ज्या संस्थाना आर्थिक मदतीची आवश्यकता आहे अशा संस्थांची माहिती मिळाल्यावर श्रीनिवास आणि हेमंत यांनी त्याबाबत अधिक माहिती घेऊन आपल्या संस्थेच्या उद्दिष्टांमध्ये पात्र ठरणाऱ्या संस्थांची माहिती कार्यकारिणीच्या मिटिंग मध्ये पटलावर ठेवली. कार्यकारिणीने त्याबाबतचा निर्णय घेऊन पुढील संस्थांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला.

1) रु. 20000/- : मतिमंद मुलांच्या देखभालीसाठी ठाणे येथे कार्यरत संस्था 'आधार' (नरहर लेले यांच्या मतिमंद मुलासाठीचे मासिक शुल्क)
2) रु. 25000/- : सेवा सहयोग फौंडेशन
3) वृद्धाश्रम चालविणारी सासवड येथील श्री ओम श्रीविश्वदर्शन सेवा संस्था रु. 20000/-
4) उमेश दिगंबर मराठे रु. 25000/- (बंधू कै. उल्हास मराठे यांच्या मुलाच्या शिक्षणासाठी.)

वरील सर्वांच्या खात्यात रकमा NEFT द्वारे जमा करण्याचे काम कोषाध्यक्ष श्री. अनंत राव यांनी पार पडले. वरील कामात कार्यकारी तसेच विश्वस्त मंडळ यांची योग्य ती साथ मिळत गेली.

कुलवृत्तांतसमितीचे प्रमुख या नात्याने पूर्व कोषाध्यक्ष श्री. श्रीनिवास यांचे प्रयत्न चालू आहेत. मात्र काही संगणकीय त्रुटींमुळे काहीसा विलंब होत आहे. आता येत्या 6/8 महिन्यांत हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचा संकल्प आहे.

27 फेब्रुवारी 2022 रोजी पुणे येथे 'मराठे प्रतिष्ठान'ची आर्थिक वर्ष 2020-21 साठीची 39 वी वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच पुणे शाखा वर्धापनदिनाचा कार्यक्रम साजरा केला गेला. कोरोनाचा प्रादुर्भाव खुपच आटोक्यात आल्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभा आणि पुणे शाखा वर्धापन दिन अशा जोड कार्यक्रमास सुमारे 50 सभासद उपस्थित होते. सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. काही ठराव मंजूर करण्यात आले. मराठयांची माहेर वाशिण सौ. मंदाताई देवधर यांनी सुश्राव्य भावगीते सादर केली. मी या दोन्ही कार्यक्रमांच्या उत्कृष्ट नियोजनाचे श्रेय मनापासून पुणे शाखा कार्यकारिणीच्या महिला मंडळाला देईन. तसेच दीर्घकाळ पुणे शाखेचे नेतृत्व केलेल्या आणि अनुभवी अशा आपल्या सौ. नीलांबरीताई यांचे योग्य ते मार्गदर्शन त्यांना मिळाले. सौ. अंजली तसेच सौ. मानसी गाडगीळ या मराठ्यांच्या माहेरवाशिणीने आणि तिच्या सहकारी मंडळींनी खुपच परिश्रम घेतले आणि आपल्यावर टाकलेली जवाबदारी समर्थपणे पार पाडली.

गतवर्षी कोरोनामुळे बरेच आर्थिक व्यवहार म्हणजे मुदतठेवींचे नुतनीकरण, आर्थिक मदतीच्या रकमा संबंधितांच्या खात्यात जमा करणे आदी कामे आपले कोषाध्यक्ष श्री. अनंत मराठे यांनी या लॉकडाऊन च्या काळातही कौशल्याने पार पाडली. त्यांना मार्गदर्शन आणि शक्य ती मदत पूर्व कोषाध्यक्ष श्रीनिवास, कार्यवाह हेमंत आणि कार्योपाध्यक्ष शैलेंद्र यांनी केली. सर्व विश्वस्त आणि मी केवळ सांगतील तशी योग्य ती साथ दिली. ही खरोखरच एक कौतुकास्पद कामगिरी आहे.

मी परत एकदा सर्व कुलबांधव आणि भगिनींना आवाहन करतो की जे सभासद नाहीत त्यांनी लवकरात लवकर सभासदत्व स्वीकारून आपल्या संस्थेला यथायोग्य आर्थिक सहाय्य केले तर चांगलेच होईल.

येणारा काळ फारच कठीण आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव समूळ नष्ट होवो आणि परत आपण सर्वजण नव्या जोमाने आपापल्या कामाला सुरुवात करोत हीच सदिच्छा.

आपला.

**विजय मराठे**

कार्याध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान.

